**<u>अर्ज निशाणी ९२ खालील आदेश</u>**

**<u>(CNR MHSI080004222022)</u>**

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ सुनिता चंद्रकांत रावराणे यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. वादी यांचे कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०९ ही दि.०८/०८/२०२४ रोजी मयत झाली आहे. वादी हे ७५ वर्षांचे वयोवृध्द गृहस्थ असून आजारपणामुळे त्यांना प्रवास करणे व कागदपत्रे गोळा करणे शक्य झाले नाही. त्यामुळे, वादींना प्रतिवादी क्र.०९ चा मृत्यूदाखला मिळवून तसेच वारसांची माहिती मिळवून वारस मुदतीत रेकॉर्डवर आणण्यास विलंब झाला आहे. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ विरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी नि.क्र.९४ प्रमाणे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जात नमुद मजकूर खोटा व खोडसाळ आहे, अर्जातील कारणे समर्पक व संयुक्तीक नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादीकडू खर्चाची रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी. प्रतिवादी क्र.८, १० व ११ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारीत करण्याबाबत विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप व पृथ्थक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आदेश –**

१. निशाणी क्र.९२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०९ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश वादीने प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांना रक्कम रु.२००/– खर्च देण्याच्या अटीवर न्यायपुर्ततेकरीता रद्द करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.06.26 10:40:25 +0530

स्थळ : वैभववाडी (शुभम जी. लटुरिया)

दिनांक : २५/०६/२०२५ न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी.